**ठळक बातम्या**

- राज्यात आणखी ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर/ दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयांची अग्रिम मदत जमा होणार

- राज्य सरकार हमी भावानं चारा खरेदी करणार

- मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार

**आणि**

- कॉक्रोच जनता पार्टीच्या २ नेत्यांना ५ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**<><><><><>**

राज्यात आणखी ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून आता एकूण ३०५ तालुक्यात १२ दुष्काळी सवलती आणि उपाययोजना लागू करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकर्‍यांच्या बँक खात्यात अग्रीम मदत म्हणून दिवाळीपूर्वी पाच हजार रूपये जमा केले जाणार असून या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितल.

**होल्ड... बाईट- मुख्यमंत्री**

पिण्याच्या पाण्यासाठी गरजेनुसार टँकरचा पुरवठा करण्यात येत असून त्याच्यावर जीपीएस ट्रॅकर लावण्यात आला आहे. तसंच, चाऱ्याच्या पुरवठ्याचा आढावा घेण्यात येत असून जास्तीत जास्त चारा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. रबी पिकं घेणाऱ्या शेतकऱ्यांनी चारापिकं घेतल्यास सगळा चारा शासन हमीभावाने विकत घेईल, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली. शेतकऱ्यांकडून कर्ज वसुलीसाठी कुठल्याही प्रकारचा तगादा लावण्यात येऊ नये, अशी सक्ती ताकीद संबंधित सोसायट्यांपासून, जिल्हा बँका, राष्ट्रीयकृत बँका आणि मायक्रोफायनान्स कंपन्यांना दिल्याचंही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शासनाचे प्रमुख म्हणून २५ वर्षं पूर्ण केल्यानिमित्त राज्य सरकारने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर केल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

राज्यातल्या छोट्या, चिंचोळ्या आकाराच्या, पोहोचण्याचा मार्ग नसलेल्या शासकीय भूखंड वितरणाच्या धोरणात सुधारणा करायला आज राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी देण्यात आली. तसंच बुलढाणा जिल्ह्यात संत गजानन महाराज संस्थानाला मौजे गिरडा इथल्या जमिनीवर यात्रास्थळ विकासासाठी बांधकामाला मंजुरी देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

<><><><>

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कृषी कर्जमुक्ती योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातल्या पात्र शेतकऱ्यांची यादी आज जाहीर झाली. यात नाशिक जिल्ह्यातल्या ४ हजार ६९१ शेतकरी खातेदारांचा समावेश आहे. या पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपये मर्यादेपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे.

<><><><>

चंद्रपूर जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासनानं विविध उपाययोजना सुरु केल्या आहेत. शेतकरी, शेतमजुरांना आणि गरजू कुटुंबांना रोजगार, तसंच जलसंधारण, सिंचनक्षमता वाढ,वृक्षलागवड आणि नैसर्गिक साधनसामुग्रीचं संवर्धन यावर विशेष भर देण्यात येत आहे. विकसित भारत ग्रामीण रोजगार आणि आजीविका हमी अभियानाअंतर्गत जिल्ह्यात २८ हजार ६८८ कामं सुरु करण्यात आली आहेत.

<><><><>

दुष्काळाच्या परिस्थितीत राज्य शासन महिलांच्या तसेच इतर सर्व नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभं असल्याची ग्वाही आरोग्य आणि महिला बालकल्याण राज्यमंत्री मेघना साकोरीकर बोर्डीकर यांनी आज दिली. त्या धाराशिव इथे नारीशक्ती संवाद कार्यक्रमात बोलत होत्या. महिलांनी आरोग्याची काळजी घेत कुटुंब व्यवस्था सक्षमपणे सांभाळावी, मराठवाड्यात या काळात बालविवाहाचे प्रमाण वाढू नये, याची दक्षता घ्यावी, नागरिकांनी सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करावेत, अशा सूचना त्यांनी केल्या.

<><><><>

राज्यात भीषण दुष्काळाची परिस्थिती असताना शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी बँका, पतसंस्था आणि मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून कर्जवसुलीसाठी तगादा लावला जात आहे, असा आरोप आज काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. वसुलीसाठी शेतकऱ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची छायाचित्रं काढणे तसंच त्यांच्यावर दबाव टाकणं असे प्रकार सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. सरकारनं दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीनं आर्थिक मदत द्यावी आणि कर्जवसुलीच्या नावाखाली सुरू असलेला त्रास थांबवावा, अशी मागणी त्यांनी केली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावरही सरकार उदासीन आहे, असं दिसून येतंय, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे प्रधानमंत्री म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७च्या दिशेने होत आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक सक्षमीकरण, आणि समर्पण भावाचा हा प्रवास सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. यानिमित्तच्या विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत ईशान्येकडच्या राज्यांबाबतच्या ॲक्ट ईस्ट धोरणा विषयी

**होल्ड- व्हीसी ( सेकंद)**

*(ईशान्येकडच्या राज्यांचं महत्त्व ओळखून केंद्र सरकारने २०१४ पासून ॲक्ट ईस्ट पॉलिसी हे विशेष कृती धोरण तयार केलं. तिथल्या अशांततेला आळा घालून स्थैर्य आणि विकासाच्या वाटेवर नेण्यासाठी प्रयत्न केले. ईशान्येकडच्या राज्यात सक्रीय बोडो, कारबी, उल्फा अशा विविध सशस्त्र गटांशी चर्चा करुन समझोता करार केले. परिणामतः दहा हजारापेक्षा जास्त अतिरेकी शरण आले. ईशान्येतल्या हिंसक घटनांमधे ७० टक्क्याहून जास्त घट झाल्याचं केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आकडेवारीत म्हटलं आहे.*

*अनेक ठिकाणी सैन्यदलांना विशेषाधिकार देणारा अफ्स्पा कायदा मागे घेण्यात आला. बारमाही रस्ते, रेल्वे, पूल इत्यादी बांधकामामधून विकासाला चालना मिळाली. ईशान्येकडची*

*राज्य आता आर्थिक विकासाचं केंद्र बनू लागल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०२३मधे आसाम दौऱ्यात सांगितलं.)*

<><><><>

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार आज सोपवण्यात आला. आधीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांचा कार्यकाळ प्रशासकीय कारणास्तव संपुष्टात आणल्यानं कटियार यांच्याकडे कार्यभार सोपवल्याचं राज्य सरकारनं आज काढलेल्या आदेशात म्हटलं आहे.

<><><><>

दिल्लीच्या विशेष कार्यकारी दंडाधिकारी न्यायालयानं आज कॉक्रोच जनता पार्टीचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली, तर अजिंक्य शिंदे यांची वैयक्तिक जातमुचलक्यावर सुटका केली. आंदोलनस्थळ म्हणून जंतर मंतरचा दर्जा काढून घेतल्यानंतरही हे सर्व जण तिथे जाण्याचा प्रयत्न करत होते, या कारणावरून त्यांना अटक केल्याचं पोलिसांनी सांगितलं.

दास आणि रांका यांना न्यायालयाने ५ दिवसांची कोठडी दिल्याचा सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी निषेध केला आहे. नागपूर इथं ते वार्ताहरांशी बोलत होते. सीजेपीचा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही, असं स्पष्ट करत त्यांनी केंद्रसरकार आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर टीका केली. लोकशाही मूल्य आणि नागरिकांच्या घटनादत्त अधिकारांसाठी एकजुटीने लढणार असल्याची भूमिका त्यांनी मांडली.

<><><><>

नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयनं आज शेषराव ऊर्फ राज सूर्यवंशी याच्या विरोधात दिल्ली न्यायालयात पुरवणी आरोपपत्र सादर केलं. नांदेडचा रहिवासी असलेला शेषराव हा नीट पेपरफुटी प्रकरणात सह-आरोपी शुभम खैरनार याचा सहकारी असल्याचं सीबीआयचं म्हणणं आहे. वैद्यकीय प्रवेश परीक्षेची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्या पालकांकडून पैसे वसूल केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी गुरुवारी दिल्ली विशेष न्यायालयात होणार आहे.

<><><><>

कॉंग्रेस नेते पवनराजे निंबाळकर हत्येप्रकरणी पद्मसिंह पाटील यांच्या निर्दोष सुटकेला सीबीआयनं मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. या प्रकरणी मुंबईच्या सत्र न्यायालयानं ठोस पुराव्याअभावी २० जून रोजी आरोपी पद्मसिंह पाटील आणि अन्य सात जणांना निर्दोष मुक्त केलं होतं.

<><><><><>

थकीत देयकांसाठी येत्या १९ तारखेला आंदोलन करण्याचा निर्णय राज्यातल्या कंत्राटदारांनी घेतला आहे. सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर यादिवशी मोर्चे काढले जाणार आहेत. राज्य सरकारनं कंत्राटदारांची सुमारे ९६ हजार कोटी रुपयांची देणी थकवली आहेत, असा आरोप राज्य कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी केला. आर्थिक तणावामुळे गेल्या १० महिन्यांत ९ कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याचंही त्यांनी संगितलं.

<><><><><>

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज हैदराबाद इथं होणार आहे. राजीव गांधी आंतरराष्ट्रीय मैदानावर संध्याकाळी सात वाजता सामना सुरु होईल. या मालिकेत २ सामने जिंकून भारताने आघाडी घेतली आहे.

//<><><><><>//